महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

## नागरी सहकारी पतसंस्थांना कर्जमर्यादा वाढविण्याबाबत

### महाराष्ट्र शासन

सहकार व वस्त्रोद्योग विभाग,

शासन परिपत्रक क्र. सीसीआर - १५९९/प्र. क्र. २८८/७-स

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२. दिनांक १२ जुलै १९९९

# शासन परिपत्रक

नागरी सहकारी पतसंस्थांच्या आदर्श पोटनियमांना शासन पत्र क्रमांक सीसीआर - ११९०/सी. आर - ४३/७-सी दिनांक २३/२/१९९३ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदर पोटनियमातील पोटनियम क्र. फ. १.१० मधील परिशिष्ट "ब" प्रमाणे नागरी सहकारी पतसंस्थांनी त्यांच्या सभासदांना निरनिराळ्या कारणासाठी मंजूर करावयाच्या कर्जमर्यादा निश्चित केलेल्या आहेत. सदर कर्जमर्यादा शासन परिपत्रक क्रमांक सीसीआर- १५९६/१६०४४/प्र. क्र. ४१०/७ स, दिनांक १४ मार्च, १९९७ अन्वये वाढविल्या आहेत. सदर मर्यादा वाढविल्यानंतरही राज्यातील निरनिराळ्या नागरी सहकारी पतसंस्थाकडून वाढते. कर्ज व्यवहार व प्राप्त होणाऱ्या ठेवींच्या अनुषंगाने सदर कर्जमर्यादा पुन्हा वाढविण्यासंबंधी वारंवार विनंती करण्यात येत असल्याने ही कर्जमर्यादा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासनाने आता विचार करून खालील अटी पूर्ण करणाऱ्या संस्थांना पुढील विहीत केलेली कर्जमर्यादा वाढविण्यास मंजुरी दिली आहे.

| | |
|---|---|
| १) वसूल भागभांडवल | –५० लाख |
| २) ठेवी | –५ कोटी |
| ३) नफा | किमान ५० लाख |
| ४) ऑडिट वर्ग | –"अ" असावा |
| ५) थकबाकीचे प्रमाण | –३% असावे |
| ६) स्वनिधीतून कर्जवाटप केलेले असावे | |

| अ. क्र. | प्रकार | अस्तित्वात असलेली कर्जमर्यादा | नव्याने अस्तित्त्वात येणारी कर्जमर्यादा व तारण |
|---|---|---|---|
| | | | |
| १) | राहत्या घरांची दुरुस्ती, गृहपयोगी वस्तू शिक्षण, लग्नप्रसंग, आजारपणातील व आजारासाठी यासाठी वैयक्तिक जामिनकी कर्ज | रु. ३०,०००/- | रु. ७५,०००/- |
| २) | नवीन वाहने उदा. ट्रक, ट्रॅक्टर, मेटाडोर, जीप अशा चार चाकी वाहन खरेदीसाठी | किंमतीच्या ७५% किंवा १.५० लाख | किंमतीच्या ७०% किंवा ५.०० लाख यापैकी कमी असलेली रक्कम.<br>१) विमा पॉलिसी संयुक्त नावाने असावी.<br>२) वाहन तसेच स्थावर मालमत्ता यांच्या तारणावर एकूण कर्जाच्या १५०% तारण असावे.<br>३) दोन वैयक्तिक जामीनदार.<br>४) वाहन खरेदीची खात्री करून दिल्याशिवाय संस्थेने कर्ज अदा करू नये व अटींवर मंजूर करावे. |
| ३) | डॉक्टर, इंजिनिअर यांना मशिनरी खरेदीसाठी | रु. १.५० लाख | रु. ५.०० लाख स्थावर मालमत्ता तसेच मशिनरी तारण ठेवून कर्जाच्या १५० पट तारण असावे. |

## सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई - ३२

## अधिसूचना

(शेअर्स धारण करण्याची मर्यादा व वाढ महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६०)

क्रमांक सीसीआर - १८९९/प्र. क्र. ३४१/७-स, दि. ३-५-२०००, ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये सहकारी संस्थांच्या सभासदांनी वैयक्तिक भाग भांडवल धारण करण्याबाबत विहीत केलेली मर्यादा नागरी सहकारी पतसंस्थांच्या सभासदांनाही लागू होते. सतत वाढत असलेल्या आर्थिक व्यवहारांमुळे मर्यादा वाढविण्याबाबत नागरी सहकारी पतसंस्थांची मागणी शासनाच्या विचाराधीन होती. नागरी सहकारी पतसंस्थांच्या या मागणी संदर्भात सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनीही शेअर धारण करण्याची मर्यादा रु. ५०,०००/- पर्यंत वाढविण्याची शिफारस शासनास केली आहे.

आणि ज्याअर्थी, नागरी सहकारी पतसंस्थांचा कर्ज व्यवहार सातत्याने वाढत असून भाग भांडवल धारण करण्याची मर्यादा वाढविणे पतसंस्थांच्या आर्थिक स्थैर्याकरिता हिताचे राहील. ही बाब लक्षात घेता नागरी सहकारी पतसंस्थांच्या सभासदांनी धारण करावयाच्या कमाल भागाची मर्यादा रु. ५०,०००/- पर्यंत असणे पतसंस्थांच्या हिताचे होईल अशी शासनास खात्री झाली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २८ (ब) च्या परंतुकान्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार नागरी सहकारी पतसंस्थांची कमाल भागांची मर्यादा रु. ५०,०००/- पर्यंत वाढविण्यास शासन मंजुरी देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

सही/-
सहसचिव, महाराष्ट्र शासन
सहकार व वस्त्रोद्योग विभाग.

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा.क्र. : नागरी बँका/डी-४/आदर्श उपविधी/स्वीकृती/२००३,
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे कार्यालय,
दिनांक १४ जानेवारी, २००३

# परिपत्रक

## विषय : नागरी सहकारी पतसंस्थांनी आदर्श उपविधी स्विकारणेबाबत.

नागरी सहकारी पतसंस्थांनी स्विकारावयाच्या आदर्श उपविधीना मान्यता देण्यात येऊन ते दिनांक ३१-३-२००३ पर्यंत स्विकारण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

आदर्श पोटनियमात ठेवीवरील व कर्जावरील व्याजदराबाबत सुचविलेल्या तरतुदीविषयी या कार्यालयाकडे मार्गदर्शन/स्पष्टीकरण मागविले होते. संस्थांचे यापूर्वी ठेवीवरील व्याजदर कर्जावरील व्याजदर व आदर्श पोटनियमातील व्याजासंबंधीची तरतूद स्विकारल्यानंतर संस्थेने आपल्या व्यवहाराचे सुसूत्रीकरण व लेख्यामध्ये योग्य ते बदल करुन घेऊन संस्थेस आर्थिक झळ सोसावी लागणार नाही या पद्धतीने व्यवस्थापन करावयाचे आहे.

संस्थांनी सुधारित आदर्श उपविधीमध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार दिनांक १-४-२००३ पासून अगर उपविधी स्विकारल्याचे तारखेपासून पतसंस्थांना जास्तीत जास्त व्याजदर द.सा.द.शे. १३% प्रमाणे ठेवीवर देता येऊ शकेल. ज्या पतसंस्थांनी सुधारित आदर्श उपविधी स्विकारणेपूर्वी द.सा.द.शे. १३% पेक्षा जास्त व्याजदराने ठेवी स्विकारल्या असतील अशा पतसंस्थांना जास्त व्याजदराच्या ठेवी द.सा.द.शे. १३% दराचे ठेवीत रुपांतर करता येतील. अशा ठेवीवर दिनांक ३१-३-२००३ पर्यंत ठेव पावतीवर नमूद केलेल्या व्याजदराने व्याज दिले जाईल व ठेव पावतीच्या उर्वरित कालावधीकरिता द.सा.द.शे. १३% दराने व्याज दिले जाईल. ठेवीदारास ठेव पावतीची रक्कम पावतीवर नमूद व्याजदाराने दिनांक ३१-३-२००३ पर्यंत होणारे व्याजासह परत घेण्याचा पर्याय असेल याबाबत सूचना खातेदारास देण्यात यावी. त्यासाठी संस्थेच्या नोटीस बोर्डावर सूचना लावावी, वृत्तपत्रात प्रसिद्ध करावी.

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा. क्र. नागरी बँक/डी-४/आदर्श उपविधी/स्वीकृती/२००३
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक २४ जानेवारी २००३

# परिपत्रक

## विषय : नागरी सहकारी पतसंस्था आदर्श उपविधी स्विकारणेबाबत.

नागरी सहकारी पतसंस्थांनी स्विकारावयाच्या आदर्श उपविधीना मान्यता देण्यात येऊन ते दिनांक ३१-३-२००३ पर्यंत स्विकारण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

आदर्श पोटनियमात व कर्जावरील ठेवीवरील व्याजदराबाबत सूचविलेल्या तरतुदीविषयी या कार्यालयाकडे मार्गदर्शन/स्पष्टीकरण मागविले होते. संस्थांचे यापूर्वी ठेवीवरील व्याजदर व कर्जावरील व्याजदर व आदर्श पोटनियमातील व्याजासंबंधीची तरतूद स्विकारल्यानंतर संस्थेने आपल्या व्यवहारांचे सुसूत्रीकरण व लेख्यामध्ये योग्य ते बदल करुन घेऊन संस्थेस आर्थिक झळ सोसावी लागणार नाही या पद्धतीने व्यवस्थापन करावयाचे आहे.

संस्थांनी सुधारीत आदर्श उपविधीमध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार दिनांक १-४-२००३ पासून अगर उपविधी स्विकारल्याचे तारखेपासून पतसंस्थांना जास्तीत जास्त व्याजदर द.सा.द.शे. १३% प्रमाणे ठेवीवर देता येऊ शकेल. ज्या पतसंस्थांनी सुधारीत आदर्श उपविधी स्विकारणेपूर्वी द.सा.द.शे. १३% पेक्षा जास्त व्याजदराने ठेवी स्विकारल्या असतील अशा पतसंस्थांना जास्त व्याजदराच्या ठेवी द.सा.द.शे. १३% दराचे ठेवीत रुपांतर करता येतील. अशा ठेवीवर दिनांक ३१-३-२००३ पर्यंत ठेवी पावतीवर नमूद केलेल्या व्याजदराने व्याज दिले जाईल व ठेव पावतीच्या उर्वरित कालावधीकरिता द.सा.द.शे. १३% दराने व्याज दिले जाईल. ठेवीदारास ठेव पावतीची रक्कम पावतीवर नमूद व्याजदराने दिनांक ३१-३-२००३ पर्यंत होणारे व्याजासह परत घेण्याचा पर्याय असेल याबाबत सूचना खातेदारास देण्यात यावी. त्यासाठी संस्थेच्या नोटीस बोर्डावर सूचना लावावी, वृत्तपत्रात प्रसिद्ध करावी.

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

जा. क्र. : नागरी बँका/डी-४/आदर्श उपविधी/स्विकृती/२००३
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे कार्यालय
दिनांक १ फेब्रुवारी, २००३

प्रति,
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था (सर्व)

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थांनी आदर्श उपविधी स्विकारण्याबाबत.**
**संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. सम दिनांक १८-११-२००२ व १-९-२००३**

उपरोक्त विषय व संदर्भाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

नागरी सहकारी पतसंस्थाना आदर्श उपविधी स्विकारण्याबाबत या कार्यालयाने दिनांक १८-११-२००२ नुसार कळविण्यात आलेले आहे. सदर आदर्श उपविधीमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्त्यांची नोंद घेण्यात यावी.

| आदर्श उपविधी पान क्रमांक | पोटनियम क्रमांक | करावयाची दुरुस्ती |
|---|---|---|
| १८ | फ १-१ | संचालक मंडळ फ १-१(७) मध्ये तज्ञ संचालक २<br>१) बँकिंगचा अनुभव असलेली तज्ञ व्यक्ती<br>२) सहकार क्षेत्रातील अनुभव असलेली तज्ञ व्यक्ती |
| २६ | फ १-११ कर्जविषयक नियम ११ब | कर्ज व्याज आकारणी सरळ व्याज पद्धतीने कटमितीने दिवसावर करणे |
| २६ | फ १-१२ | दंडव्याज : थकीत कर्ज/व्याज रकमेवर द.सा.द.शे. २% दंडव्याज आकारले जाईल. |
| २६ | १-१३(क) कर्जविषयक नियम २२ | एकूण ठेवीच्या कमीत कमी २०% इतकी रक्कम मध्यवर्ती सहकारी बँकेत मुदत ठेवीत, शासकीय कर्ज रोख्यात अथवा सहकार खात्याच्या निर्देशानुसार गुंतवावी लागेल |
| ५० | नियम क्र. २१ | वरीलप्रमाणे |
| ५९ | परिशिष्ट क-२ | मधील टीप : नागरी/ग्रामीण-बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ त्यांच्यासंबंधीत (कन्सर्नस) त्यांचे नातेवाईक किंवा त्यांच्यासंबंधीत संस्था यांना दिलेली एकूण कर्ज (तारणी/विनातारणी) पतसंस्थेच्या एकूण मागणी आणि मुदत देय रकमेच्या (क्मउंदक द्व ज्पउम स्पंइपसपजपमे) च्या ५% पेक्षा जास्त होता कामा नये. |

ही बाब सर्व संस्थांच्या तात्काळ निदर्शनास आणून देण्यात यावी.

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे करिता

जा.क्र.ना. बँका/डी-४/आदर्श उपविधी/स्वि./०३
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक : १८-२-२००३

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था (सर्व)

२) जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था (सर्व)

विषय : नागरी सहकारी पतसंस्थांनी आदर्श उपविधी स्विकारणेबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र सम क्रमांक दि. १८-११-२००२, १-१-२००३, १-२-२००३

उपरोक्त विषय व संदर्भाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२) या कार्यालयाचे पत्र दि. १८-११-२००२ नुसार सर्व नागरी सहकारी पतसंस्थांनी आदर्श उपविधी स्विकारण्याचा कालावधी दि. २८-२-२००३ पर्यंत विहीत करण्यात आलेला होता. सदर उपविधी स्विकारण्याबाबत नागरी सहकारी पतसंस्थांना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन त्यांना आदर्श उपविधी स्विकारण्यास अंतिमतः दिनांक १५-८-२००३ (पूर्वी) पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी ही बाब आपल्या अधिनस्त असलेतरी सहकारी पतसंस्थांच्या तात्काळ निदर्शनास आणून द्यावी.

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता

महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक : ५-३-२००४

प्रति,
१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थांनी आदर्श उपविधी स्विकारणेबाबत.**
**संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. सम, दिनांक १८-११-२००२, १-१-२००३,**

उपरोक्त विषय व संदर्भाकडे आपले लक्ष वेधणेत येत आहे.

नागरी सहकारी पतसंस्थांना आदर्श उपविधी स्विकारणेबाबत या कार्यालयाने दि. १८-११-२००२ नुसार कळविण्यात आलेले आहे. सदर आदर्श उपविधीमध्ये वेळोवेळी सुचविण्यात आलेल्या दुरुस्त्यांखेरीज खालीलप्रमाणे दुरुस्त्या पोटनियमात करण्यात याव्यात.

| आदर्श उपविधी पा. क्र. | पोटनियम क्रमांक | करावयाची दुरुस्ती / समावेश |
|---|---|---|
| ६ | ब-१-१ | शेतमाल खरेदी- विक्री करणे, शेतमालाची साठवणूक करणे, ग्राहक भांडार चालविणे, सभासदांच्या पाल्यासाठी शिक्षण देणे, तांत्रिक शिक्षण देणे. |
| १८ | फ-१-१ | संस्थांचे कार्यक्षेत्र व त्यांचा शाखा विस्तार विचारात घेऊन त्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी संचालक मंडळ सदस्य संख्या निश्चित करण्याची मुभा संस्थांना असेल. |
| १९ | फ-१-३ | अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडीचा कालावधी ठरविण्याचा अधिकार संस्थांना राहील. |
| ५७ | कर्जविषयक परिशिष्ट क-२ मधील १ | वसूल भागभांडवल रु. ५०/- लाख असणाऱ्या संस्थांना सामान्य कर्ज मर्यादा रु. ७५,०००/- राहील. |
| ६० | निवडणूक नियमावली परिशिष्ट ड | नागरी सहकारी पतसंस्थांच्या निवडणुका यापूर्वीच्या पोटनियमातील तरतुदीनुसार सहकार खात्यामार्फत होतील. |
| ३३ | कर्जविषयक नियम क्र. १० | कर्ज परतफेडीसाठी अल्प मुदत - १ वर्षे, मध्यम मुदत - ५ वर्षे व दिर्घ मुदत - १० वर्षे अशी राहील. |

ही बाब आपल्या जिल्ह्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या तात्काळ निदर्शनास आणून देण्यात यावी.

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता

मा. सहकार आयुक्त
यांचे मान्यतेने

जा. क्र. ना.बँका/डी-४/आदर्श उपविधी/स्विकृती/दुरुस्ती/०४
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक २९ सप्टेंबर २००४

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३) उपनिबंधक / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था

विषय : नागरी सहकारी पतसंस्थांनी आदर्श उपविधी स्विकारणेबाबत.
संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. सम, दिनांक १८-११-२००२, १-१-२००३ व ५-३-२००४ उपरोक्त विषय व संदर्भाकडे आपले लक्ष वेधणेत येत आहे.

नागरी सहकारी पतसंस्थांना आदर्श उपविधी स्विकारणेबाबत या कार्यालयाने दिनांक १८-११-२००२ नुसार कळविण्यात आलेले होते. सदर आदर्श उपविधीमध्ये वेळोवेळी सुचविण्यात आलेल्या दुरुस्त्यांखेरीज खालीलप्रमाणे दुरुस्त्या पोटनियमात करण्यात याव्यात अशा सूचना दिनांक ५-३-२००४ च्या परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या होत्या.

सदर दुरुस्तीमुळे नागरी सहकारी पतसंस्थांच्या मूळ ठेवी स्विकारणे व कर्ज देणे या उद्देशा व्यतिरिक्त पतसंस्था शेतीमाल खरेदी विक्री व्यवसायात जास्त लक्ष देऊ लागलेल्या आहेत. परिणामी संस्थांच्या कामकाजावर व आर्थिक स्थितीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. या प्रकरणी अशा दुरुस्त्यांचा दुरुपयोग नागरी सहकारी पतसंस्थांकडून होऊ लागल्याची बाब या कार्यालयाच्या निदर्शनास येऊ लागलेल्या आहेत. नागरी सहकारी पतसंस्था आर्थिकदृष्ट्या व सक्षम व त्याच्यामुळे ठेवी स्विकारणे व कर्ज वाटप करणे या उद्देशानुसारच कार्यरत राहणे आवश्यक झालेले आहे. ही बाब विचारात घेता या कार्यालयात दिनांक ५-३-२००४ नुसार खालीलप्रमाणे सुचिवलेल्या दुरुस्ती रद्द करण्यात येत आहे.

| आदर्श उपविधी पान क्रमांक | पोटनियम क्रमांक | करावयाची दुरुस्ती/ आदेश |
|---|---|---|
| १८ | फ-१-१ | संस्थांचे कार्यक्षेत्र व त्याचा शाखा विस्तार विचारात घेऊन त्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी संचालक मंडळ सदस्य संख्या निश्चित करण्याची मुभा संस्थांना असेल. |
| १९ | फ-१-३ | अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडीचा कालावधी ठरविण्याचा अधिकार संस्थांना राहील. |

तसेच आदर्श उपविधीतील पोटनियम क्रमांक ब-१-१ उद्देश शेतमाल खरेदी-विक्री करणे, शेतमालाची साठवणूक करणे, ग्राहक भांडार चालविणे, सभासदांच्या पाल्यासाठी तांत्रिक शिक्षण या उद्देशांचा समाविष्ट करण्याबाबत प्राप्त पोटनियम पुढील आदेश होईपर्यंत मंजूर करु नयेत. तसेच पोटनियम क्रमांक फ-१-१ व फ-१-३ बाबतच्या दुरुस्त्याही नामंजूर कराव्यात.

ही बाब आपल्या जिल्ह्यातील सर्व नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या तात्काळ निदर्शनास आणून देण्यात यावी व ज्या संस्थांना वरील दुरुस्त्या मंजूर केलेल्या आहेत अशा संस्थांच्या दुरुस्त्याही तात्काळ रद्द करण्यात याव्यात.

सही/-

मा. सहकार आयुक्त
यांचे मान्यतेने

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता

प्रत,

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई प्रशासकीय कार्यालय
१९८-३-९ बाळकृष्ण चेंबर्स ताराराणी चौक, कोल्हापूर

त्यांना कळविण्यात येते की, यापुढे सुधारीत आदर्श उपविधीची छपाई करताना उपरोक्त दुरुस्त्यांची छपाई करण्यात येऊ नये.

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : सीसीआर-११०८/प्र. क्र. ६४७/७-स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक १७/१०/२००८

विषय : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ (अ) (१) नुसार राज्यातील सर्व पतसंस्थांना त्यांच्या उपविधीत दुरुस्ती करून त्यांनी फक्त 'अ' वर्ग सभासदांशीच व्यवहार करणे बंधनकारक करणेबाबत द्यावयाचे निदेश

वाचा : सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. बँका/डी-४/पतसंस्था/अ वर्ग सभासद/१२९८/२००८, दि. ९-८-२००८

प्रस्तावना :

नागरी व ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या आदर्श उपविधी क, ब १.१ मधील तरतुदीनुसार पतसंस्थांनी त्यांचे सभासदांशी व्यवहार करणे, ठेवीदाराकडून ठेवी स्विकारणे आणि सभासदांना कर्ज देणे हा पतसंस्थांचा मूळ उद्देश आहे.

पतसंस्थेतील सर्व ठेवीदार व कर्जदार हे पतसंस्थेचे 'अ' वर्ग सभासद असल्यामुळे ते संस्थेच्या नियमित व दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवू शकतात व सदर पतसंस्था ही सभासदांच्याच मालकीची असल्याने सभासदांना पतसंस्थेवर विश्वास असतो.

नागरी सहकारी पतसंस्थांमधील ठेवी मिळत नसल्याचे अनुषंगाने अडचणीतील पतसंस्थांचा आढावा घेतला असता अनेक पतसंस्थांनी त्यांचेकडे ठेवी ठेवलेल्या ठेवीदारांना सभासद करून घेतलेले नाहीत तसेच अनेक कर्जदारांना व जामिनदारांना नाममात्र सभासद करून घेवून कर्जवितरण केलेले आहे. अशा सर्व सभासदांना नियमित सभासद न करता फक्त नाममात्र सभासद केल्यामुळे प्रत्येक संस्थेत नाममात्र सभासदांची संख्या भरमसाठ असून अशा सभासदांना नियमित सभासदत्वापासून तसेच त्या बाबतच्या त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले जाते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ३० व नियम ३२ मध्ये सभासदांना संस्थेची माहिती घेण्याचे अधिकार आहेत. मात्र असे ठेवीदार व कर्जदार हे पतसंस्थेचे नियमित सभासद नसल्यामुळे त्याना संस्थेकडून माहिती मिळत नाही व पर्यायाने ठेवीदारास व कर्जदारास तक्रारी कराव्या लागतात. यासाठी पतसंस्थांच्या उपविधीत दुरुस्ती करून 'अ' वर्ग सभासदाशीच कर्ज व ठेवीबाबतचे व्यवहार करावे असे बंधनकारक केल्यास 'अ' वर्ग सभासदांचा पतसंस्थांच्या कामकाजात सहभाग वाढेल व पतसंस्थांवरील अविश्वास कमी होईल.

वरील सर्व बाबी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या असून या सर्व बाबींचा विचार करून जनहिताच्या दृष्टीने तसेच शासनाने अवलंबिलेल्या सहकार विषयक व इतर विकास विषयक कार्यक्रमाची यथोचित अंमलबजावणी निश्चित करण्यासाठी, तसेच पतसंस्थांच्या कामकाजाचे योग्य व्यवस्थापन व्हावे यासाठी किंवा संस्थेच्या सदस्याच्या किंवा ठेवीदारांच्या हितास हानी पोहोचेल अशारितीने संस्थेचे कामकाज चालविले जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने

महाराष्ट्र सहकारी संस्थाचे अधिनियम, १९६० चे कलम ७९ 'अ' (१) अन्वये शासनास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये निर्देश देणे आवश्यक आहे अशी शासनाची खात्री झाली आहे.

## निर्देश :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अे (१) अन्वये शासनास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार राज्यातील सर्व नागरी सहकारी पतसंस्था/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना त्यांच्या उपविधीमध्ये दुरुस्ती करून फक्त 'अ' वर्ग सभासदाशीच ठेवी व कर्जाबाबतचे व्यवहार करणे बंधनकारक करणेबाबत निर्देश देण्यात येत आहेत.

या निर्देशांची अंमलबजावणी दोन महिन्यांचे आत करण्यात यावी तसेच अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित निबंधकाची राहील. त्यांनी याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करावा. या निर्देशाचे पालन न झाल्यास सर्व संबंधित नियमाप्रमाणे कारवाईस पात्र राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(बी. एस. यमपल्ले)
विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,

१) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

२) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था

३) सर्व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था

४) निवड नस्ती